226

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

Pune Metropolitan Region Development Authority, Pune

PUNE METROPOLIS

नविन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे – 411 044

New administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune – 411 044

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.विप्रा/पु.म.प्रे.वि.प्रा./ले.व.वि.वि/ ७१५ /२०२५ दिनांक : १५/०८/२०२५

## कार्यालयीन आदेश

**विषय :-** प्रशासकीय कामकाजात गतिमानता येण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयातील अधिकाऱ्यांना सुधारित अधिकार प्रत्यार्पित करणेबाबत.

**संदर्भ :-** १) कार्यकारी समितीच्या दि. १०.०४.२०१७ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

२) कार्यालयीन आदेश क्र. पु.म.प्र.वि.प्रा./ENGG १&२/२०२२/५७/३३५१ दि. १६.१०.२०२३. .परिशिष्ट (क).

३) कार्यालयीन आदेश क्र.विप्रा./पु.म.प्रे.वि.प्रा./ले.व.वि.वि/९४०/२०२४ दि.१२.०१२.२०२४.

उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ अन्वये महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासकीय कामकाजात गतिमानता येण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा कार्यालयातील अधिकाऱ्यांना सुधारित अधिकार प्रत्यार्पित करण्यात आले होते. तद्नंतर संदर्भ क्र. ३ अन्वये कार्यालयीन आदेशानुसार संदर्भ क्र.२ चे प्रत्यार्पित करण्यात आलेले अधिकार रद्द करण्यात आले होते.

संदर्भ क्र.१ अनुसार परिशिष्ठ -१ कलम ७(५) अन्वये अधिकारांचे प्रत्यार्पण महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कायदा सन २०१६ मधील ***टिप अनुसार महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे यांना त्यांच्याकडे प्रत्यार्पित झालेले अधिकार, त्यांचे स्तरावरुन त्यांचे अधिनस्त अधिकाऱ्यांना पुनश्चः प्रत्यार्पण करण्याचे अधिकार राहतील*** असे नमूद आहे.

त्यानुसार तांत्रिक मान्यता देण्याचे मा. महानगर आयुक्त यांचे अधिकार मुख्य अभियंता यांना या आदेशान्वये प्रत्यार्पित करण्यात येत आहेत. मात्र तांत्रिक मान्यता देणेपूर्वी सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकीय मान्यता असणे आवश्यक राहील. हे आदेश पूर्वलक्षी प्रभावाने दि.१२.१२.२०२४ पासून लागू राहतील.

(डॉ. योगेश म्हसे (भा.प्र.से)
महानगर आयुक्त तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे**